महाराष्ट्र शासन

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था

रविनगर, नागपूर- 440001.

**District Institute of Education And Training, Ravinagar, Nagpur 440 001**

ई-मेल :- diecpdnagpur@maa.ac.in दूरध्वनीक्रमांक 0712-2561936/2542834

जा.क्र. जिशिवप्रस/नाग/I/1820248/२०२५ दिनांक :- 28.10.2025

प्रति,

१. मा. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)
२. मा. जिल्हा क्रीडा अधिकारी (सर्व)
3. शिक्षणाधिकारी प्राथमिक, जि.प. (सर्व)
४. शिक्षणाधिकारी माध्यमिक, जि.प. (सर्व)
५. तालुका क्रीडा अधिकारी (सर्व)
६. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व)
७. प्रशासनाधिकारी,मनपा नपा, सर्व

**विषयः-** शिक्षक व अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी विविध स्पर्धाचे आयोजन करणेबाबत.

**संदर्भ**:- १.राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०.
२.राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४.
३.शासननिर्णय क्र. संकीर्ण २०२४/प्र.क्र.१०/एसडी-६ मंत्रालय, मुंबई दि. १५ मार्च २०२४ (SQAAF)
४. मा.संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांचे पत्र क्रमांक जा.क्र.साव्याावि/राशैसंवप्रप/शिक्षक स्पर्धा /२०२५-२६/SCERT-33.0/36/2025-CPD
५. मा. संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांचे दिनांक १४/१०/२५ रोजीच्या ऑनलाईन सभेतील सूचना.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, DIET मधील अधिकारी, कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृद्धिंगत करणे, त्यांच्यात समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजिटल, भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर विविध स्पर्धाचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासुन करण्यात येत आहे.

या स्पर्धाच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा ह्या एकूण **४२ विषयांवर** आधारित असणार आहेत. नमूद स्पर्धाचे निकष व नियमावली बाबतची सविस्तर माहिती शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका ह्या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांनी सदर पुस्तिकेत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करावे. सदर

Scanned with CamScanner

पुस्तिका ही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र. पुणे ह्या संस्थेच्या www.maa.ac.in ह्या संकेतस्थळावर उपयुक्तः या टॅबवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

वरील नियोजनानुसार सन 2025- 26 वर्षापासून एकूण 42 स्पर्धांचे आयोजन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व डायट कडून आयोजित करण्यात येणार आहेत. त्यानुसार तालुकास्तरावर स्पर्धांचे आयोजन करावयाचे आहे.**वरील 42 स्पर्धांपैकी व्यक्ति विकास (केस स्टडी) स्पर्धेचे राज्यस्तरीय आयोजनाची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नागपूर** या संस्थेकडे देण्यात आलेली आहे.त्यानुसार या स्पर्धा आयोजनाबाबतच्या सूचना खालील प्रमाणे आहेत.

**स्पर्धा आयोजनाबाबत सूचना:-**

संदर्भ पत्र क्रमांक चारच्या नुसार नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी म्हणजेच 7 नोव्हेंबर 2025 पासून राज्यस्तरीय वेळापत्रकाप्रमाणे प्रत्येक तालुका स्तरावर स्पर्धा घेण्याचे नियोजित आहे, त्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. स्पर्धेसाठी नाव नोंदणी जिल्हा/राज्य यांचेकडून केंद्रप्रमुख यांना लिंक देण्यात येईल.

२. केंद्रप्रमुख यांनी प्रत्येक स्पर्धेसाठी केंद्रातून एका शिक्षकाचे नाव स्पर्धेसाठी लिंक वर नोंदवावे.

३. प्रत्येक स्पर्धेत केंद्रातील किमान एका शिक्षकाने सहभाग घेणेबाबत प्रोत्साहित करण्यात यावे.

४. स्पर्धानिहाय सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांची शिक्षकाची लेखी संमती घ्यावी व स्पर्धेवेळी आयोजकाकडे सादर करावी.

५. सर्व स्पर्धांसाठी तालुकास्तरावर सहभाग घेणाऱ्या शिक्षक अधिकारी व कर्मचारी यांचे नामनिर्देशन गुगल फॉर्मद्वारे संकलित केली जाईल. एका शिक्षकाला अनेक स्पर्धांमध्ये भाग घ्यावयाचे असल्यास आपल्या केंद्रातील इतर सर्व शिक्षकांनी भाग घेतला आहे, याची अगोदर खात्री करावी. त्यानंतरच एका शिक्षकाला अनेक स्पर्धांमध्ये भाग घेण्यास विचार करावा.

६. केवळ केंद्रप्रमुख यांना लिंक पाठवली जाईल व केंद्रप्रमुख यांनी स्वतः शिक्षकांची क्षमता कौशल्य पाहून नामनिर्देशन करावे.

७. 29 ऑक्टोबर 2025 पर्यंत केंद्रप्रमुख यांनी शिक्षकांची माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

८. वैयक्तिक तालुका स्तरावरील प्रत्येक स्पर्धेचा विजेता विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र राहील.

९. सांघिक क्रीडा विभागीय स्पर्धांसाठी प्रत्येक जिल्ह्यातून एक संघ निवडला जाईल जिल्ह्यातून एक उत्कृष्ट संघ किंवा तालुक्यामधून येणाऱ्या संघातील उत्कृष्ट खेळाडूंचा समावेश करून विभाग स्तरासाठी जिल्ह्याचा संघ तयार करता येईल.

१०. या स्पर्धांची तयारी करण्यासाठी कोणत्याही प्रकारची सुट्टी घेता येणार नाही तसेच शिक्षकांच्या सहभागामुळे अध्ययन अध्यापनाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

११. तालुकास्तरावर वरील स्पर्धांची जबाबदारी ही गटशिक्षणाधिकारी यांची राहील. गटशिक्षणाधिकारी यांनी तालुका क्रीडा अधिकारी व तालुकास्तरीय समितीच्या मदतीने तालुकास्तरीय स्पर्धा विहित वेळेत पार पाडाव्यात. तालुकास्तरावर DIET, नागपूर येथील संबंधित तालुक्याचे संपर्क अधिकारी (वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता) हे तालुका समन्वयक म्हणून काम पाहतील. तसेच तालुकास्तरावर एका विषय साधन व्यक्तीची सहाय्यक समन्वयक म्हणून नियुक्ती करावी.

१२. तालुकास्तरीय स्पर्धेसाठी सक्षम परीक्षकांची नावे अंतिम करून डायटकडे बायोडाटा सह दिनांक 29/10/2025 पर्यंत पाठवावी तसेच स्पर्धेचे ठिकाणही कळवावे. परीक्षकांसाठी एससीईआरटी, पुणे कडून निधी प्राप्त झाल्यास स्पर्धेच्या दिवसासाठी निर्धारित मानधन देण्यात येईल.

Scanned with CamScanner

१३. स्पर्धेच्या नियमावली सोबत जोडलेल्या आयोजन समितीचे बैठकीचे आयोजन करून स्पर्धेविषयी माहिती द्यावी व तालुकास्तरीय स्पर्धा गटशिक्षणाधिकारी यांनी, विभाग स्तर व राज्यस्तर स्पर्धांचे आयोजन संबंधित जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था यांनी एससीईआरटी पुणे कडील नियोजनानुसार करण्यात यावे. याबाबत आवश्यकतेनुसार वरिष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

**सोबत,**

1. संभाव्य स्पर्धा नियोजन/आयोजन
2. **व्यक्ति विकास (केस स्टडी)** स्पर्धा नियमावली
3. संदर्भीय पत्र क्र 4

Signed by Harshalata Vasantrao Burade
Date: 28-10-2025 12:03:37

(डॉ. हर्षलता बुराडे)
**प्राचार्य**
**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,**
**रविनगर नागपूर.**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

1.मा.संचालक,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे
2.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, सर्व
3.मा.आयुक्त, महानगरपालिका, सर्व
4. मा. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व

Scanned with CamScanner

# व्यक्ती अभ्यास (केस स्टडी)

## 1. स्पर्धेची प्रस्तावना

आजच्या शैक्षणिक व बौद्धिक प्रवासात व्यक्ती अभ्यास केस स्टडी स्पर्धा ही एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरते. व्यक्तिमत्त्वांचे सखोल विश्लेषण करताना त्यांच्या जीवनप्रवासातील संघर्ष, कार्यशैली, विचार, ध्येय-ध्येयवादी दृष्टिकोन आणि समाजावर झालेला प्रभाव यांचा अभ्यास करण्याची संधी ही स्पर्धा उपलब्ध करून देते. या माध्यमातून शिक्षक व्यक्तीचे गुणविशेष ओळखून त्यांचे विश्लेषण करू शकतील, संशोधनात्मक लेखनाचा सराव करतील, आपल्या मांडणीद्वारे प्रेरणादायी संदेश समाजासमोर मांडू शकतील. म्हणूनच, व्यक्ती अभ्यास केस स्टडी स्पर्धा ही केवळ एक स्पर्धा नसून चिंतन आणि सृजनशीलतेची एक अर्थपूर्ण यात्रा आहे, जी प्रत्येक सहभागीस अधिक संवेदनशील, विचारशील आणि प्रेरक बनवते.

## 2. स्पर्धेचे स्वरूप

सदरची स्पर्धा ही अंगणवाडी तसेच सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या ( जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका ) प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील तसेच खाजगी (अनुदानित व विनाअनुदानित ) शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी तसेच अध्यापक विद्यालयातील शिक्षकांसाठी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आहे

- ➢ ही स्पर्धा सर्व माध्यमांसाठी व सर्व व्यवस्थापनासाठी आहे
- ➢ सर्व शिक्षक /शिक्षकेतर/ पर्यवेक्षीय कर्मचाऱ्यांसाठी आहे
- ➢ ही स्पर्धा सर्व विषयांसाठी लागू आहे
- ➢ एका स्पर्धकास एकाच स्पर्धेत एकाच विषयासाठी एकाच गटात सहभागी होता येईल
- ➢ मुख्याध्यापक तथा प्राचार्य यांचे संमती पत्र असणे आवश्यक आहे
- ➢ स्पर्धेचे सादरीकरण करणे बंधनकारक आहे
- ➢ सादरीकरणाची भाषा मराठी /हिंदी /इंग्रजी असावी व त्यापैकी कोणते एका भाषेतून स्पर्धकाला सादरीकरण करता येईल मात्र विजेता सर्व माध्यमातून पहिल्या तीन क्रमांकाचे काढले जातील
- ➢ सर्व माध्यम व सर्व व्यवस्थापन मधूनच अनुक्रमे पहिल्या तीन क्रमांकाची पारितोषिके वितरित केले जातील

Scanned with CamScanner

## 3.स्पर्धेचा उद्देश

य स्पर्धेचा उद्देश शिक्षकामध्ये निरीक्षणशक्ती, चिंतनशीलता, संशोधनाची आवड आणि विचारमंथनाची सवय विकसित करणे हा आहे. एखाद्या व्यक्तीचे जीवन केवळ घटना नसून ते प्रेरणादायी अनुभवांचे भांडार असते. त्या व्यक्तीच्या यशामागील प्रयत्न, अपयशातून शिकण्याची तयारी आणि कठीण परिस्थितींतील निर्णयक्षमता यांचा मागोवा घेताना सहभागींच्या मनातही साहस, नेतृत्वगुण आणि सकारात्मक विचारसरणी रुजते.

## 4. व्यक्ती अभ्यास स्पर्धेतील सादरीकरणाचे महत्त्वाचे मुद्दे

१. प्रस्तावना (Introduction)

- निवडलेल्या व्यक्तीची ओळख
- त्या व्यक्तीचा अभ्यास करण्यामागचा उद्देश किंवा प्रेरणा

२. व्यक्तीची पार्श्वभूमी

- जन्म, कुटुंब व शैक्षणिक माहिती
- बालपणातील घटना किंवा प्रेरणादायी प्रसंग

३. संघर्ष आणि आव्हाने

- आयुष्यातील कठीण काळ
- अडचणींवर मात करण्यासाठी घेतलेले निर्णय व धैर्य

४. कार्य / योगदान (Achievements & Contributions)

- संबंधित क्षेत्रातील कार्य
- समाज, राष्ट्र किंवा क्षेत्रासाठी केलेले योगदान
- पुरस्कार, सन्मान किंवा गौरव

५. व्यक्तिमत्त्वाचे गुणधर्म

- नेतृत्वगुण / मेहनत / प्रामाणिकपणा / दृष्टिकोन
- कोणते प्रेरणादायी गुण आपण स्वीकारू शकतो

६. सामाजिक व मानवी मूल्ये

- समाजासाठी त्यांनी दिलेला संदेश
- त्यांच्या कार्याचा आजच्या पिढीवर परिणाम

७. समीक्षात्मक विश्लेषण (Critical Analysis)

- त्या व्यक्तीच्या कार्यातून शिकण्यासारखे धडे
- त्यांच्या निर्णयांची सकारात्मक व नकारात्मक बाजू (असल्यास)

Scanned with CamScanner

**८. प्रेरणा व निष्कर्ष**

- त्या व्यक्तीकडून आपल्याला काय शिकायला मिळाले?
- आजच्या जीवनात ते धडे कसे उपयुक्त ठरतील?

९. सादरीकरण शैलीसाठी टिप्स

- आवाज स्पष्ट, आत्मविश्वासपूर्ण असावा
- बोलीभाषा साधी व प्रभावी ठेवा
- आवश्यकतेनुसार कोट्स किंवा घटना वापरा
- वेळेचे नियोजन करून ४—५ मिनिटांत संपूर्ण मांडणी

**5.व्यक्ती अभ्यास स्पर्धेचे नियम**

सहभागी शिक्षकानी खालील नियमांचे पालन करणे आवश्यक आहे:

१. व्यक्तीची निवड

- कोणतीही सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक किंवा प्रेरणादायी व्यक्ती निवडू शकता.
- व्यक्ती काल्पनिक नसून खऱ्या जीवनातील असावी.

२. अभ्यास व सादरीकरण स्वरूप

- सादरीकरण मराठी / हिंदी / इंग्रजी यापैकी निर्धारित भाषेत करावे.
- सादरीकरणात तथ्य, माहिती, घटना व विश्लेषण असावे.
- केवळ जीवनी सांगण्यापेक्षा व्यक्तिमत्त्वाचे अभ्यासपूर्ण विश्लेषण अपेक्षित आहे.

३. वेळ मर्यादा

- एकूण वेळ: ३ ते ५ मिनिटे ( बदल होऊ शकतो)
- वेळेचे काटेकोर पालन करावे.

४. मांडणीचे मुख्य घटक

- प्रस्तावना
- जीवनपरिचय व पार्श्वभूमी
- कार्य व योगदान

Scanned with CamScanner

- आव्हाने व संघर्ष
- व्यक्तिमत्त्व विश्लेषण
- प्रेरणा व निष्कर्ष

५. सादरीकरण शैली

- पाठांतर न करता समजून सांगणे अपेक्षित.
- आवाज स्पष्ट, आत्मविश्वासपूर्ण व प्रभावी असावा.
- हातवारे, अभिव्यक्ती आणि दृष्टी संपर्क योग्य असावा.
- आवश्यक असल्यास चित्रफलक / स्लाईड / प्रॉप्स वापरू शकता (परवानगी असल्यास).

६. विश्वसनीय माहिती

- माहिती विश्वसनीय स्रोतांवर आधारित असावी (पुस्तके, चरित्र, लेख इ.)
- चुकीची किंवा अपूर्ण माहिती देऊ नये.

७. मूल्यमापन निकष

| घटक | गुण |
|---|---|
| • विषयाची निवड व ज्ञान | 20 |
| • विश्लेषण व विचारसरणी | 20 |
| • भाषाशैली व स्पष्टता | 20 |
| • सादरीकरण व आत्मविश्वास | 20 |
| • प्रेरणादायी निष्कर्ष | 20 |
| एकूण | 100 गुण |

८.निषिद्ध गोष्टी

- इतरांचे सादरीकरण तंतोतंत नकल करू नये.
- कोणत्याही व्यक्तीबद्दल अपमानास्पद भाषा वापरू नये.
- वेळ मर्यादा ओलांडू नये.

९. इतर सूचना

- पोशाख शिस्तबद्ध असावा.
- सादरीकरणापूर्वी नाव, वर्ग, निवडलेली व्यक्ती स्पष्ट सांगावी.
- शेवटी प्रेरणादायी संदेशाने समाप्त करावे.

Scanned with CamScanner